# एकाच दिवसात ५ रुग्णांवर हृदयाचा व्हॉल्व्ह बदलण्याची प्रक्रिया

## लीलावती हॉस्पिटलमधील डॉक्टरांना यश

**मुंबई :** हृदयाला रक्तपुरवठा करणारी शुद्ध रक्तवाहिनीची झडप (अॅओर्टिक वॉल्व) बंद झाल्याने रक्तप्रवाहास अडथळा निर्माण झालेल्या पाच रुग्णांवर मुंबईतील लीलावती हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे ट्रान्सकॅथेटर अॅओर्टिक वॉल्व रिप्लेसमेंट (टीएव्हीआर) प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. डॉ. रविंदर सिंग राव (इंटरव्हेंशनल स्ट्रक्चरल कार्डिओलॉजिस्ट आणि टीएव्हीआर आणि मित्रक्लिप तज्ज्ञ) यांच्यासह टीमने एकाच दिवसात पाच रुग्णांवर हृदयाचा व्हॉल्व्ह बदलण्याची प्रक्रिया यशस्वी केली आणि या पाचही रुग्णांना नव्याने जीवनदान मिळाले.

७९ वर्षांचे मुंबईतील रहिवासी निलेश शर्मा (नाव बदलले आहे) यांना छातीत जड वाटणे तसेच श्वास घेण्यास त्रास होत होता. २००२ मध्ये त्यांची बायपास शस्त्रक्रिया झाली, तर २००६ मध्ये प्रोस्टेट शस्त्रक्रिया (TURP) झाली आणि त्यांना उच्च रक्तदाबाची समस्या होती. रुग्णाला गंभीर महाधमनी स्टेनोसिसची समस्या होती. दिवसेंदिवस रुग्णाचे हृदय अकार्यक्षम होत असल्याचे आढळून आले. अशावेळी प्रसंगावधान राखत डॉक्टरांनी टीएव्हीआर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

७२ वर्षीय नेहा कुमार (नाव बदलले आहे) यांची दहा वर्षांपूर्वी २०१४ मध्ये डाव्या स्तनाचा कर्करोगावर मास्टेक्टॉमी, उच्च रक्तदाब आणि शस्त्रक्रियेने महाधमनी झडप बदलण्यात आली. रुग्ण क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीजने (सीओपीडी) ग्रस्त होत्या. रुग्णाची बायोप्रोस्थेटिक व्हॉल्व्ह खराब झाली होती आणि गेल्या ६ महिन्यांपासून दम लागण्यासारख्या लक्षणांसह गंभीर महाधमनी स्टेनोसिसचे निदान झाले.

रुग्ण ७२ वर्षीय हेमा सिन्हा (नाव बदलले आहे) या लठ्ठपणाने ग्रस्त होत्या. त्यांना उच्च रक्तदाब, मधुमेह, हायपरलिपिडेमिया आणि ऑस्टियोआर्थरायटिस होता. त्यांना गंभीर महाधमनी स्टेनोसिसचे निदान झाले होते, त्यांचा बीएमआय ४६ इतका असून, त्या लठ्ठपणासारख्या आजाराचा सामना करत होत्या.

पुण्यातील ८५ वर्षीय रुग्ण गीता व्यंकटेश (नाव बदलले आहे) यांना उजव्या स्तनाचा कर्करोग (२०११ मध्ये मास्टेक्टॉमी), २०१२ मध्ये कोलन शस्त्रक्रिया आणि २०२२ पासून पार्किन्सन आजाराने ग्रासले होते. रुग्णाला गंभीर महाधमनी स्टेनोसिस असल्याचे निदान झाले आणि त्यांचे वाढलेले वय, शारीरिक कमकुवतपणा आणि पूर्व-अस्तित्वात असलेल्या कोमॉर्बिडीटीमुळे त्यांना टीएव्हीआर शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. मुंबईतील ६५ वर्षीय रुग्ण रुता पारीख (नाव बदलले आहे) यांचा मधुमेह मेल्तिस आणि गंभीर महाधमनी स्टेनोसिसचा वैद्यकीय इतिहास होता, जानेवारी २०२४ पासून त्यांना पायऱ्या चढत असताना दम लागण्याची तक्रार जाणवत होती.

या सर्व रुग्णांना गंभीर महाधमनी स्टेनोसिस होते, म्हणजेच तीव्र स्वरुपाचे अॅओर्टिक स्टेनोसिस असल्याचे निदान झाले. या स्थितीमध्ये महारोहिणीच्या झडपेच्या झापा काही अडथळ्यामुळे नीट उघडत नाहीत. या गंभीर परिस्थितीत त्वरित उपचार आवश्यक होते, कारण यामुळे दम लागणे, हालचालींवर मर्यादा येणे आणि दैनंदिन कामे करण्याची क्षमता कमी होणे यांसारखी लक्षणे दिसू लागली.